नियमीत फौजदारी खटला क्र. **१२५/२०१७**
निशाणी क्र. **४४/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **भाग्यश्री विराग मेहता** |
| वय सुमारे | : | ३२ वर्षे, व्यवसाय : शिक्षिका |
| निवासस्थान | : | वडोदरा, गुजरात |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती नईमा घट्टे यांचेमार्फत</u> :**

दि. २१/०६/२०१४ रोजी माझे आरोपी क्र. १ सोबत लग्न झाले. दि. १८/०६/२०१६ पासून मी माझ्या आईवडीलांसोबत वडोदरा–गुजरात येथे राहते. मला आरोपी क्र. १ पासून दोन मुले आहेत. ज्यावेळी माझे लग्न झाले त्यावेळी आरोपी क्र. १ मुंबई येथे जॉब करत होते. मी त्यांची आई आरोपी क्र. २ यांच्यासोबत अलिबाग येथे राहात होते. शनिवार–रविवार माझ्या पतीला सुट्टी असायची व ते त्या दोन दिवशी अलिबागला यायचे.

०२. लग्नानंतर काही दिवस आरोपी क्र. १ माझ्याशी चांगले वागले. त्यांचा स्वभाव विक्षिप्त असल्याची मला नंतर जाणीव झाली. तरीही मी त्यांच्यासोबत संसार करत होते. त्यावेळी मला त्यांच्यापासून पहिला मुलगा दि. २६/०५/२०१५ रोजी झाला. दोन्ही आरोपी मला माझ्या वडीलांच्या जमिनीतून हिस्सा मागण्यासाठी बळजबरी करायचे व दुस–या मुलींचे व वडीलांचे उदाहरण द्यायचे. मी या गोष्टीला नकार दिला. त्यानंतर आरोपी क्र. १ ला मुंबईत खोली घ्यायची होती त्यासाठी त्याने माझ्या वडीलांकडे पैशांची मागणी केली. माझ्या वडीलांनी पैसे देण्यास नकार दिला. त्यानंतर त्याने माझा मानसिक व शारीरिक छळ करण्यास

सुरुवात केली. मी माझ्या आईवडीलांना कळविले व अलिबाग नगर परिषदेच्या उपनगराध्यक्षा सुरक्षा शहा यांना मध्यस्थी करण्यास सांगितले. त्यांनी आरोपींना समजाविले. परंतु त्यांच्या वागणुकीत सुधारणा झाली नाही.

०३. त्यानंतर मी दुस—यांदा गरोदर राहिले. तीन महिन्यांची गरोदर असताना दि. १६/०६/२०१६ रोजी मला अस्वस्थ वाटत होते. दि. १७/०६/२०१६ रोजी सकाळी ८.०० ते ८.३० वाजताच्या दरम्यान मला जास्त अस्वस्थ वाटू लागले होते. त्यावेळी माझ्या सासू देवळात गेल्या होत्या. त्याच इमारतीमध्ये माझे वडील दुस—या माळ्यावर राहात होते. मी त्यांना अस्वस्थ वाटत असल्याचे सांगितले. त्यांनी मला शासकीय रुग्णालयात नेले. डॉक्टरांनी तपासणी करुन मला भरती करुन घेतले. माझा मोठा मुलगा त्यावेळी माझ्या सासूकडे होता. मी त्यांना फोन केला त्यावेळी माझ्या सासूने, 'तुला मुलगा पाहिजे असल्यास कोर्टात येवून घे,' असे म्हटले. दि. १८/०६/२०१६ रोजी मला रुणालयातून सुट्टी मिळाली त्यानंतर मी माझ्या वडीलांकडे गेले. मी न्यायालयाकडून मुलाचा ताबा घेतला.

०४. दि. १८/०६/२०१६ व त्यानंतर दि. ११/०७/२०१६ रोजी मी अलिबाग पोलीस ठाण्यात अर्ज दिला होता की मला माझे पती व सासूकडून शारीरिक व मानसिक त्रास होत आहे. सदर दोन्ही अर्ज दाखल केलेले आहेत. त्यातील मजकूर खरा असून त्यावर माझ्या सह्या आहेत. ते **निशाणी क्र. ४५** व **४६** वर आहेत. ज्यावेळी मी आरोपींकडे राहात होते त्यावेळी त्यांनी माझा मोबाईल घेतला होता व ते मला माझ्या घरच्यांशी बोलायला व भेटायला मनाई करत होते. मी पोलीस ठाण्यात जावून फिर्याद दिली. फिर्यादीतील मजकूर खरा असून त्यावर माझी सही आहे. फिर्याद **निशाणी क्र. ४७** वर आहे. सदर घटनेच्या छापील प्रथम खबरी अहवालातील मजकूर खरा असून त्यावर माझी सही आहे. सदर छापील

प्रथम खबरी अहवाल **निशाणी क्र. ४८** वर आहे. लग्नाची पत्रिका **निशाणी क्र. ४९** कडे आहे. विवाह नोंदणी प्रमाणपत्र **निशाणी क्र. ५०** कडे आहे.

**सरतपास संपला**.

**उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. प्रविण ठाकूर यांचेमार्फत** :

०५. आरोपी क्र. १ सोबत मी घरच्यांच्या संमतीने प्रेमविवाह केलेला आहे. आमचे प्रेमसंबंध होते त्यावेळी मी 'शिवराम नंदा' इमारतीत दुस—या माळ्यावर राहायचे व आरोपी पहिल्या माळ्यावर राहात होते. आम्ही दोघेही वेगवेगळ्या समाजाचे होतो. आमचा विवाह विधीपूर्वक वैदिक पद्धतीने झालेला आहे. घरच्यांना आमचे प्रेमसंबंध माहित झाल्यापासून आमचे लग्न सहा महिन्यांत झाले. माझे गाव गोंधळपाडा हे अलिबागपासून १५ ते २० मिनिटांच्या अंतरावर आहे. आमचे लग्न व्यवस्थित पार पडले होते.

०६. आरोपींच्या घरी आरोपींव्यतिरिक्त इतर सदस्य नाही. माझे आईवडील दुस—या माळ्यावर व मी आरोपींसोबत पहिल्या माळ्यावर राहात होते. हे म्हणणे खरे आहे की, दुसरे मूल होईपर्यंत मी आरोपीविरुद्ध पोलीस ठाण्यात फिर्याद दिली नव्हती. आरोपी क्र. १ मुंबईत ज्यावेळी नोकरीला होते त्यावेळी त्याच्या मित्रांनी त्यांना फसविले होते, हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ मुंबई येथे नोकरीला असल्याने तेथेच आम्ही खोली घेवून राहावे असे मला वाटत होते. आरोपी क्र. २ यांचे 'मेहता स्टोअर्स' नावाचे दुकान होते. ते सकाळी दुकानात जायचे, दुपारी घरी यायचे व पुन्हा दुकानात जावून रात्री घरी परत यायचे. मी सुद्धा त्यांच्यासोबत दुकान सांभाळत असे.

०७. माझी माझ्या आईवडीलांसोबत रोज भेट होत असे. आरोपी क्र. १ कडे त्याचा जॉब, स्वत:ची सदनिका व दुकान होते. आरोपी क्र. १ ची आर्थिक स्थिती

मला माहीत होती व माझ्या वडीलांची आर्थिक स्थिती आरोपींना माहीत होती. आज माझ्या वडीलांकडे शेती व्यतिरिक्त उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नाही. माझ्या वडीलांचे दुकान होते. हे म्हणणे खरे नाही की, ते दुकान चालत नव्हते त्यामुळे ते त्यांनी बंद केले होते. अंदाजे नऊ वर्षे आधी दुकान बंद झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांची संपत्ती ही त्यांच्या भावांची सामाईक संपत्ती आहे. माझ्या वडीलांच्या शेतीचे क्षेत्रफळ व ती कुठे आहे हे फिर्याद देतेवेळी सांगितले नव्हते.

०८. सुरक्षा शहा यांना भेटायला आरोपी क्र. १ गेले होते व त्यांनी भेट घडवून आणली होती. आमच्यामध्ये आणखी एक मिटींग झालेली होती व ती सुद्धा आरोपी क्र. १ ने घडवून आणली होती. माझ्याकडे सुरक्षा शहा एकूण दोन वेळा आल्या होत्या त्यापैकी एकदा सुरक्षा शहा व आरोपी क्र. २ गोंधळपाडा येथे आले होते व दुस–यांदा सुरक्षा शहा, ॲड. तुळपुळे व आरोपी क्र. २ माझ्या वडीलांकडे शिवराम नंदा या इमारतीत आले होते. मी दि. १८/०६/२०१६ रोजी पासून माझ्या वडीलांकडे दुस–या माळ्यावर राहायला गेले. त्यावेळी आरोपी क्र. १ घरी नव्हता, हे मला माहीत नाही. त्या दिवशी आरोपी क्र. २ सकाळी मंदिरात गेल्या होत्या, हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे सर्व सामान व दागिने घेवून दुस–या माळ्यावर गेले होते.

०९. दि. १७/०६/२०१६ रोजी मी सिव्हील हॉस्पीटलमध्ये भरती झाले होते. त्यावेळी माझे उपचार स्त्री रोग व प्रसूती तज्ञ डॉ. वाजे व डॉ. जगदाळे यांच्याकडे चालू होते. ज्यावेळी मी माझ्या वडीलांकडे राहायला गेले त्यावेळी आठ दिवसांकरीता माझा मुलगा आरोपींकडे होता. माझा मुलगा मिळावा यासाठी मी पोलीस ठाण्यात गेले होते व त्यानंतर न्यायालयात अर्ज दाखल

केला. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी आरोपींविरुद्ध हुंड्याची तक्रार केली नाही. मुलगा मिळावा यासाठी मी न्यायालयात आले त्यावेळी माझा व आरोपींमध्ये मध्यस्थी व्हावी असे ठरले होते व वकीलांनी त्याबाबत प्रयत्न केले होते, हे मला आठवत नाही. दुसरा मुलगा झाल्यानंतर मी कधीही मला नांदायला घेवून जाण्यासाठी आजपर्यंत अर्ज केला नाही. त्यानंतर मी गोंधळपाडा येथे राहायला गेले. हे म्हणणे खरे नाही की, माझे आईवडील आजही गोंधळपाडा येथे राहतात.

१०. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळी आरोपी क्र. १ मुलाला भेटायला माझ्या आईवडीलांकडे यायचा त्यावेळी माझे आईवडील व कुटुंबिय त्याला शिवीगाळ करायचे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ ला माझ्या वडीलांनी दोनदा मारहाण केली याबाबत त्याने माझ्या वडीलांविरुद्ध पोलीस ठाण्यात तक्रार केलेली आहे. आरोपी क्र. १ ला मुलाचा ताबा हवा होता व मला सुद्धा हवा होता. ॲड. तुळपुळे व सुरक्षा शहा यांनी मला नांदायला जाण्याची विनंती केली होती. आरोपी क्र. १ ने घटस्फोटासाठी कधीही अर्ज केला नाही. आरोपी क्र. १ ने मुलांचा ताबा मिळण्याकरीता कौटुंबिक न्यायालयात अर्ज केलेला आहे. मी बडोद्याला नोकरी करत आहे. कौटुंबिक न्यायालयाने आरोपी क्र. १ ला बडोदा येथे दोन्ही मुलांना भेटण्याची मुभा दिली आहे. मी त्याला दरवेळी भेटू देते.

११. हे म्हणणे खरे नाही की, माझे आईवडील माझ्या शेजारीच राहात असल्याने त्यांचा माझ्या संसारात सतत हस्तक्षेप होत असे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील नाहक लहानसहान वाद घालत असत. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळी मी दुस–यांदा गरोदर होते त्यावेळी माझे वडील गर्भपात करायला सांगत होते व त्याला आरोपी क्र. १ चा विरोध होता. हे म्हणणे खरे नाही की, माझे उपचार स्त्री रोग व प्रसूती तज्ञांकडे सुरु होते तरीही मी हट्टाने शासकीय रुग्णालय, अलिबाग

येथे जावून भरती झाले. सदर बाब आरोपी क्र. १ ला समजल्यानंतर त्याने माझ्या वडीलांना फोन केला, हे मला माहीत नाही. माझ्या वडीलांनी त्याला, अद्दल शिकवतो असे म्हणून फोन बंद केला, हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दुस–या दिवशी आरोपी क्र. १ माझ्या वडीलांना समजवायला आला परंतु माझ्या वडीलांनी आरोपी क्र. १ सोबत वाद घातला. हे म्हणणे खरे नाही की, दुस–या दिवशी आरोपी क्र. १ मला बघायला शासकीय रुग्णालयात आला होता परंतु मी तेथे नसल्याने तो घरी आला परंतु तेथेही मी नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना कोणतीही कल्पना न देता माझ्या वडीलांकडे दुस–या माळ्यावर गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांचे मित्र दामले यांनी सुद्धा आमच्यातील वाद वाढविला. हे म्हणणे खरे नाही की, मला आरोपी क्र. १ सोबत नांदायचे नाही त्यामुळे मी त्यांच्याविरुद्ध खोटी फिर्याद दिली.

१२. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ चा स्वभाव विक्षिप्त आहे हे मला नंतर समजले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना माझ्या वडीलांची जमीन कुठे आहे हे माहीत नाही तसेच त्यांनी कधीही जमीनीत हिस्सा मागितला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांकडे कोणतीही जमीन नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हुंड्यासाठी माझी छळणूक करत होते, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क. १ ने मुंबईत खोली घेण्यासाठी माझ्या वडीलांकडे पैशांची मागणी केली, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी व मी हुंड्यासाठी नकार दिल्याने आरोपींनी माझा शारीरिक व मानसिक छळ केला, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सुरक्षा शहा यांनी आरोपींना समजावण्याचा प्रयत्न केला परंतु ते समजले नाहीत, हे मी खोटे सांगत आहे.

१३. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सासूला फोन केला त्यावेळी

त्यांनी न्यायालयातून मुलाचा ताबा घे असे मला सांगितले, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझी कोणत्याही प्रकारे शारीरिक व मानसिक छळणूक केलेली नसूनही मी त्यांच्याविरुद्ध खोटी फिर्याद दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझ्याकडून फोन काढून घेतला व ते मला माझ्या आईवडीलांशी बोलू व भेटू देत नव्हते, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. १८/०६/२०१६ रोजी मी पोलीसांकडे कोणताही अर्ज केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी मुलाचा ताबा घेण्यासाठी गेले त्यामुळे माझ्या मनात त्यांच्याविषयी राग निर्माण झाला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ विनंती करत होता की मी मुलांसह त्याच्याकडे नांदायला यावे म्हणून मी त्यांच्याविरुद्ध खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, आजही आरोपी क्र. १ मला नांदवायला तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ सोबत मुलांची भेट होवू नये म्हणून मी वडोदरा येथे राहायला गेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत समक्ष

( **शै. वा. उगले** ) ( **शै. वा. उगले** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.
अलिबाग.
दिनांक : **१५/०३/२०२४**.

नियमीत फौजदारी खटला क्र. **१२५/२०१७**
निशाणी क्र. **/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०२** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **सुरक्षा जगदीश शहा** |
| वय सुमारे | : | ५४ वर्षे, व्यवसाय : गृहीणी |
| निवासस्थान | : | पूर्वी अलिबाग, सध्या राहणार : मु. रायपूर, छत्तीसगड |

**सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एस्. एम्. छापेकर यांचेमार्फत :**

सन २०१७ मध्ये मी अलिबाग येथे राहात होते. विराग मेहता व त्याची पत्नी भाग्यश्री यांना मी ओळखते. सन २०१६ मध्ये मी उपनगराध्यक्षा, अलिबाग नगर परिषद म्हणून कार्यरत होते. विराग व त्याच्या पत्नीमध्ये वाद होते व त्याची पत्नी दुसऱ्यांदा गरोदर होती. त्या दोघांमध्ये सामंजस्याने व्यवस्थित व्हावे म्हणून मी त्या दोघांमध्ये समेट घडवून आणण्याकरीता गेले होते. त्या दोघांमधील वाद मिटला नाही. पोलीसांनी त्या संदर्भात माझा जबाब घेतला होता.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. प्रविण ठाकूर यांचेमार्फत** :

०२. हे म्हणणे खरे आहे की, ॲड. पल्लवी तुळपुळे, विरागची आई व मी असे तिघे विरागच्या पत्नीच्या घरी गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, लग्नापूर्वी विराग अलिबाग मधील शितोळे आळी येथील 'शिवराम नंदा' या इमारतीत पहिल्या मजल्यावर राहात होता व त्याची पत्नी दुसऱ्या मजल्यावर राहात होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या दोघांचा प्रेमविवाह होता. हे म्हणणे खरे आहे

की, विराग घरात नसताना भाग्यश्रीचे वडील तिला गोंधळपाडा येथे स्वत:हून घेवून गेले होते व ती परत यावी म्हणून मी तिला समजावण्यासाठी गेले होते. हे म्हणणे खरे आहे की, भाग्यश्रीच्या वडीलांनी व भाग्यश्री हिने परत येण्यास नकार दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, विरागची व त्याच्या आईची ती परत नांदण्यास यावी अशी इच्छा होती.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )

दिनांक : **२०/०६/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **१२५/२०१७**
निशाणी क्र. **७१/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०३** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **विजेंद्र रमेश दिवेकर** |
| वय सुमारे | : | ६२ वर्षे, व्यवसाय : व्यापार |
| निवासस्थान | : | मु. अवदूत पंप, दांडिया मार्ग, बडोदा |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत</u>:**

०१. मी माझ्या कुटुंबासह अलिबाग येथे राहात होतो. मला भाग्यश्री व वर्षा अशा दोन मुली आहेत. माझी मुलगी भाग्यश्री हिचा विवाह विराग विनोद मेहता यांच्यासोबत झाला. त्यांचा विवाह दि. २१/०६/२०१४ रोजी कच्छी भवन, अलिबाग येथे जैन पद्धतीने लावून दिला होता. त्यांचा संसार सुरुवातीला व्यवस्थित झाला. त्यानंतर तिने सांगितले की, तिचे पती व सासू पैशांची मागणी करत आहेत. ते तिला धमकी देत होते व तिचा मानसिक छळ करत होते. त्यानंतर ती माहेरी आली. आम्ही तिला समजावून सासरी पाठवून दिले. परंतु परत पती व सासू तसेच करत असल्यामुळे दि. १८/०६/२०१६ रोजी मुलगी परत माहेरी आली. तेव्हापासून ती आमच्याकडेच राहात आहे.

०२. माझी मुलगी भाग्यश्री हिला दोन मुले आहेत. दुसऱ्या वेळी दोन महिन्यांची गरोदर असताना ती माहेरी आली होती.

०३. माझ्या मुलीने सांगितले की, ते पैशांची मागणी करत आहेत. माझ्याकडे त्यांनी मुंबई येथे घर घेण्यासाठी पैशांची मागणी केली होती परंतु मी त्यांना नकार दिला होता. माझ्या मुलीने पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. प्रविण ठाकूर यांचेमार्फत</u>** :

वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास मध्यान्हापर्यंत तहकूब करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **२७/०३/२०२६**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

**<u>मध्यान्हानंतर उलटतपास आरोपी क्र. १ व २ करीता वकील श्री. प्रविण ठाकूर यांचेमार्फत</u>** :

०४. दि. १८/०६/२०१६ रोजी माझी मुलगी माझ्या घरी परत आली. घरी म्हणजे ‘शिवराम नंदा’ या सोसायटीमध्ये आली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी शिवराम नंदा सोसायटीमध्ये पहिल्या माळ्यावर राहात होता व आम्ही दुसऱ्या माळ्यावर राहात होतो. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही व आरोपी एकाच इमारतीत राहात असल्यामुळे फिर्यादी व आरोपी क्र. १ चे प्रेमसंबंध जुळून आले. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही दोन्ही कुटुंबांनी ठरवून रितीरिवाजाप्रमाणे त्यांचे कच्छी हॉलमध्ये लग्न लावून दिले होते.

०५. हे म्हणणे खरे आहे की, मेहता कुटुंबाचे स्वतःचे दुकान आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ हा मुंबईमध्ये कामाला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी घरामध्ये माझी मुलगी व सासूव्यतिरिक्त कोणीही राहात नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, तिची सासू किराणा दुकानामध्ये सकाळपासून सायंकाळपर्यंत जात होती. हे म्हणणे खरे आहे की, माझी मुलगी घरातच असायची.

०६. माझी मुलगी तेथे राहात असताना एकदा पोलीसात तक्रार केली होती. लेखी तक्रार केली होती. माझे मूळ गाव अलिबागपासून तीन किलोमीटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलीला समजावण्यासाठी ॲड. निला तुळपुळे, अलिबागच्या उपनगराध्यक्षा सुरक्षा शहा ह्या आल्या होत्या. त्या शिवराम नंदा ह्या सोसायटीमध्ये आल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, शिवराम नंदा ह्या सोसायटीमध्ये जाण्याकरीता एकच जीना आहे.

०७. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलीने नवऱ्याने नांदायला न्यावे म्हणून अर्ज केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, पहिल्यांदा मुलगी निघून गेल्यानंतर आरोपी क्र. १ घरी येवून तिला घेवून गेला होता व ते एकत्र राहात होते. हे म्हणणे खरे आहे की, ती परत गेल्यानंतर ती गरोदर राहिली होती. सन २०१६ मध्ये आम्ही शिवराम नंदा सोसायटी सोडून गोंधळपाडा येथे राहायला गेलो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ मुलाला भेटायला आमच्या घरी येत होता. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही त्याला मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी फिर्यादीचा पैशासाठी छळ केला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ ने फिर्यादीचा मानसिक छळ केला होता व त्यामुळे ती माहेरी आली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मुंबई येथे घर घेण्यासाठी पैसे मागितले हे मी खोटे सांगत आहे.

०८. माझी मुलगी शाळेत शिक्षिका म्हणून बडोदा येथे काम करते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ मुलांना भेटण्यासाठी बडोदा येथे आला होता. साक्षीदार सांगतो की, कोर्टाच्या आदेशाप्रमाणे आम्ही त्यांना भेटायला पोलीस ठाण्यात देत होतो. आरोपींनी मुलांची भेट व्हावी म्हणून अर्ज केला होता. आमचे

मूळ गाव अलिबाग आहे. विराग हा आज रोजी तुरुंगात आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ चे असे म्हणणे आहे की, फिर्यादीने त्याच्यासोबत मुलांसह एकत्र राहावे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीची आरोपी क्र. १ सोबत राहण्याची इच्छा नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला फिर्यादी व आरोपी एकत्र राहू नये असे वाटत असल्यामुळे आम्ही खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असलेला कोणताही प्रकार घडलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा जबाब दिलेला आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **२७/०३/२०२६**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **१२५/२०१७**
निशाणी क्र. **७२/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०४** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **वैशाली विजेंद्र दिवेकर** |
| वय सुमारे | : | ५४ वर्षे, व्यवसाय : गृहिणी |
| निवासस्थान | : | मु. अवदूत पंप, दांडिया मार्ग, बडोदा |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत</u>:**

०१. मला भाग्यश्री आणि वर्षा अशा दोन मुली आहेत. भाग्यश्री हिचा विवाह विरागसोबत जून–२०१४ मध्ये झाला होता. विवाहानंतर भाग्यश्री व तिचे पती यांच्यामध्ये भांडण होवू लागले. ते तिला सांगत होते की, आपल्यामध्ये ५० तोळे सोने देतात, पैसे देतात. आम्हाला त्यांची पद्धत माहिती नव्हती. भाग्यश्री व विराग यांचा प्रेमविवाह होता व त्यामुळे आम्ही त्यांचे लग्न लावून दिले होते. विराग व त्यांची आई भाग्यश्रीचा मानसिक छळ करत होते.

०२. भाग्यश्री सन २०१६ पासून आमच्याकडे राहात आहे. तिला होत असलेल्या त्रासाबाबत तिने पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. प्रविण ठाकूर यांचेमार्फत</u>** :

वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास मध्यान्हापर्यंत तहकूब करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **२७/०३/२०२६**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

**<u>मध्यान्हानंतर उलटतपास आरोपी क्र. १ व २ करीता वकील श्री. प्रविण ठाकूर यांचेमार्फत</u> :**

०३. पोलीसांना जबाब देताना मी सांगितले होते की, आरोपी सांगत होते की, 'आमच्या समाजामध्ये ५० तोळे सोने देतात, पैसे देतात.' पोलीसांना जबाब देताना मी सांगितले होते की, तिला घरामध्ये लॉक करुन आरोपी जात होते. सदरच्या बाबी माझ्या जबाबात का नमूद नाहीत याचे कारण मी सांगू शकत नाही.

०४. दि. १८/०६/२०१६ रोजी माझी मुलगी माझ्या घरी परत आली. घरी म्हणजे शिवराम नंदा या सोसायटीमध्ये आली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी शिवराम नंदा सोसायटीमध्ये पहिल्या माळ्यावर राहात होता व आम्ही दुसऱ्या माळ्यावर राहात होतो. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही व आरोपी एकाच इमारतीत राहात असल्यामुळे फिर्यादी व आरोपी क्र. १ चे प्रेमसंबंध जुळून आले. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही दोन्ही कुटुंबांनी ठरवून रितीरिवाजाप्रमाणे दोघांचे कच्छी हॉलमध्ये लग्न लावून दिले होते.

०५. हे म्हणणे खरे आहे की, मेहता कुटुंबाचे स्वतःचे दुकान आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ हा मुंबईमध्ये कामाला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी घरामध्ये माझी मुलगी व सासूव्यतिरिक्त कोणीही राहात नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, तिची सासू किराणा दुकानामध्ये सकाळपासून सायंकाळपर्यंत जात होती. हे म्हणणे खरे आहे की, माझी मुलगी घरातच असायची.

०६. दि. १८/०६/२०१६ रोजी माझ्या मुलीने पोलीसात तक्रार केली नव्हती. माझी मुलगी सरकारी रुग्णालयात ॲडमीट होती. हॉस्पीटलमधून आम्ही

तिला आमच्या घरी नेले होते. त्या दिवशी आरोपी क्र. १ हा मुंबई येथे होता. माझे मूळ गाव वेश्वी येथे आहे. ते अलिबागपासून ३ कि.मी अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलीला समजावण्यासाठी ॲड. निला तुळपुळे, अलिबागच्या उपनगराध्यक्षा सुरक्षा शहा ह्या आल्या होत्या. त्या शिवराम नंदा ह्या सोसायटीमध्ये आल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, शिवराम नंदा ह्या सोसायटीमध्ये जाण्याकरीता एकच जीना आहे.

०७. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलीने नवऱ्याने नांदायला न्यावे म्हणून अर्ज केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, पहिल्यांदा मुलगी निघून गेल्यानंतर आरोपी क्र. १ घरी येवून तिला घेवून गेला होता व ते एकत्र राहात होते. हे म्हणणे खरे आहे की, ती परत गेल्यानंतर ती गरोदर राहिली होती. सन २०१६ मध्ये आम्ही शिवराम नंदा सोसायटी सोडून गोंधळपाडा येथे राहायला गेलो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ मुलाला भेटायला आमच्या घरी येत होता. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही त्याला मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी फिर्यादीचा पैशासाठी छळ केला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ ने फिर्यादीचा मानसिक छळ केला होता व त्यामुळे ती माहेरी आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मुंबई येथे घर घेण्यासाठी पैसे मागितले हे मी खोटे सांगत आहे.

०८. माझी मुलगी शाळेत शिक्षिका म्हणून बडोदा येथे काम करते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ मुलांना भेटण्यासाठी बडोदा येथे आला होता. साक्षीदार सांगते की, कोर्टाच्या आदेशाप्रमाणे आम्ही त्यांना भेटायला पोलीस ठाण्यात देत होतो. आरोपींनी मुलांची भेट व्हावी म्हणून अर्ज केला होता. आमचे

मूळ गाव अलिबाग आहे. विराग हा आज रोजी तुरुंगात आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ चे असे म्हणणे आहे की, फिर्यादीने त्याच्यासोबत मुलांसह एकत्र राहावे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीची आरोपी क्र. १ सोबत राहण्याची इच्छा नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला फिर्यादी व आरोपी एकत्र राहू नये असे वाटत असल्यामुळे आम्ही खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असलेला कोणताही प्रकार घडलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा जबाब दिलेला आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **२७/०३/२०२६**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.